


# हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४




■ वर्ष ७५ वे/अंक १४३ वा ■ ■ अमरावती, शुक्रवार, दिनांक १० जानेवारी २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २६ पौष १९४६ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■




## १२ आमदारांच्या नियुक्तीबाबत महायुतीला हायकोर्टाकडून दिलासा

मुंबई दि. ९ : राज्यपाल नामनिर्देशित विधानपरिषदेच्या १२ आमदारांबाबत महायुतीला हायकोर्टाकडून मोठा दिलासा मिळालाय. कैबिनेटमध्ये यादी मागे घेण्याचा निर्णय कायदेशीर असल्याचं हायकोर्टाने म्हटलं आहे. महायुती सरकारला आव्हान देणारी ठाकरे गटाची याचिका हायकोर्टानं फेटाळली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे कोल्हापूर शहरअध्यक्ष सुनील मोदी यांनी दाखल याचिका केली होती. मात्र, हायकोर्टाकडून महाविकास आघाडीचे याचिका फेटाळल्याने ठाकरे गटासह महाविकास आघाडीला मोठा धक्का मानला जातोय.



तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोष्यारी आणि महाविकास आघाडी सरकारमध्ये विधानपरिषदेच्या १२ आमदारांच्या नियुक्तीवरुन वाद रंगला होता. महाविकास आघाडी सरकारनं ६ नोव्हेंबर २०२० रोजी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे १२ आमदारांच्या नावाची यादी पाठवली होती. ही यादी ५ सप्टेंबर २०२२ रोजी मागे घेण्यात आली. *(उर्वरित पान २ वर)*

## पक्ष बघणार नाही, दोषी आढळला तर कडक कारवाई : अजित पवार

पुणे दि. ९ : कुठल्याही चौकशीत आरोप झाला तर तुम्ही दोषी आहे, आज एसआयटी चौकशी चालू आहे. सीआयडी चौकशी चालू आहे. न्यायालयीन चौकशी चालू आहे. तीन वेगवेगळ्या एजन्सी चौकशी करतात. स्वतः राज्याच्या मुख्यमंत्री सांगितले आहे. जो कुणी दोषी असेल, जो संबंधित असेल तर ते सिद्ध झालं तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणालेत.



बीडमधील सरपंच हत्याप्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले जात आहे. भाजप आमदार सुरेश धस हे वारंवार धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करत असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. धनंजय मुंडे प्रककरणावरुन आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाष्य आपली भूमिका मांडलीय.

माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा वेगवेगळ्या तपास यंत्रणेकडून तपास चालू आहे. आता कुठल्याही चौकशीत आरोप झाला तर तुम्ही दोषी आहे, आज एसआयटी चौकशी चालू आहे. सीआयडी चौकशी चालू असल्याचं अजित *(उर्वरित पान २ वर)*

## कारखान्याची चिमणी कोसळली, ९ जणांचा मृत्यू

रायपूर दि. ९ : छत्तीसगडमधील मुंगेली येथे मोठी दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. स्मेल्टिंग प्लांटची चिमणी कोसळल्याने २५ कामगार ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत आत्तापर्यंत ९ कामगारांचा मृत्यू झालाय. ढिगाऱ्याखालून दोन मजुरांना बाहेर काढण्यात आले असून जखमी मजुराला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनन व्यवस्थेने बचाव कार्याला सुरुवात केली आहे.

अधिकची माहिती अशी की, कारखान्याची चिमणी कोसळल्याने २५ पेक्षा अधिक कामगार ढिगाऱ्याखाली *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




बटेंगे तो वोट मिलेंगे असे आम्ही ठरवले आहे त्यामुळे जो जास्त वाटेल त्याला आम्ही मत दान करणार आहे...

## ... तर ८ दिवसात प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देतो : जयंत पाटील

मुंबई दि. ९ : राष्ट्रवादी शरद पवार गटाचा प्रदेशाध्यक्ष बदलावा अशी मागणी करणाऱ्या पक्षांतर्गत विरोधकांना जयंत पाटील यांनी आव्हान दिलं आहे. पुढच्या दोन दिवसात प्रत्येकाने आपल्या वॉर्डात पक्षाला किती मतं दिली त्याचा डेटा द्या, आठ दिवसात स्वतःहून प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देतो असं जयंत पाटील म्हणाले. पक्ष चालवणं हे काही सोपं काम नाही, सगळ्यांना एकत्र घेऊन काम करावं लागलं असंही ते म्हणाले.



राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष बदलावा अशी मागणी काही कार्यकर्त्यांनी केली. त्यावर जयंत पाटील *(पान २ वर)*

## शिक्षकांच्या पगारी रखडल्याचा प्रश्न, अजित पवारांचा भर पत्रकार परिषदेतून थेट मंत्रालयात फोन

मुंबई दि. ९ : राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक खर्चाचा भर राज्य सरकारच्या तिजोरीवर पडल्याने विविध खात्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी याबाबतची खंत देखील व्यक्त केली होती. मात्र, शासनाकडून हे फेटाळण्यात येत असून लाडकी बहीण योजनेसाठी पैशांची तरतूद करण्यात आल्याचं *(उर्वरित पान २ वर)*

## भारतीयांचा विदेशातही डंका : मोदी

नवी दिल्ली दि. ९ : भारतीय जिथे जातात, तिथे स्वतःचे अस्तित्व निर्माण करतात.



जगात ते कुठेही असले, तरी त्यांच्यात देशाप्रती आदर असतो. आपल्या प्रतिभेच्या बळावर विदेशातही अनिवासी भारतीयांचा डंका असल्याचे गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथे आयोजित १८ व्या प्रवासी भारतीय परिषदेला आभासी पद्धतीने ते उपस्थित होते. यावेळी *(पान २ वर)*

## पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन महाराष्ट्रात नागपूरहून पुणे व मुंबईसाठी धावणार



नवी दिल्ली दि. ९ : वंदे भारत ट्रेनची क्रेझ अद्यापही भारतीय प्रवाशांमध्ये कायम आहे. वंदे भारत ट्रेनची सेवा देशभरात सुरू आहे. प्रवाशांकडून वंदे भारत ट्रेनला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. वंदे भारत ट्रेनच्या निर्मितीने भारतीय रेल्वेने एक नव्या अध्यायाला सुरुवात केली आहे. प्रवाशांचे हित लक्षात घेता भारतीय रेल्वेने वंदे भारत ट्रेनची वैविध्यपूर्ण प्रकार आणले. यामध्ये अमृत भारत ट्रेन, वंदे भारत मेट्रो यांचा समावेश आहे. आता वंदे भारत ट्रेनचा आणखी एक प्रकार लवकरच भारतीय प्रवाशांचा सेवेत असणार आहे, तो म्हणजे वंदे भारत स्लीपर ट्रेन. पहिली झलक समोर आणल्यानंतर वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या चाचण्यांना सुरुवात झाली आहे. लवकरच पहिली स्लीपर वंदे भारत ट्रेन मार्गस्थ होणार असल्याचे सांगितले जात आहे.

महाराष्ट्रात कोणत्या मार्गावर पहिली वंदे भारत ट्रेन चालवली जाईल, याबाबत रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सूतोवाच केले आहे. यासंदर्भात एक प्रस्ताव मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाने रेल्वे बोर्डकडे सादर केल्याची माहिती नागपूरचे नवे नियुक्त डी. आर. एम विनायक गर्ग यांनी दिली आहे. डी. आर. एम विनायक गर्ग यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ते मीडियाशी बोलत होते. गेल्या वर्षांपासून नागपूर ते मुंबई व नागपूर ते पुणे या दोन्ही मार्गावर नवीन गाड्या सुरू करण्याची मागणी प्रवाश्यांकडून करण्यात येत होती. त्या अनुषंगाने *(पान २ वर)*

## 'इंडिया' आघाडी संपुष्टात?

नवी दिल्ली दि. ९ : लोकसभा निवडणुकीला ८ महिने झाले नाही तोवर देशात भाजपा विरोधी पक्षांनी बनवलेली इंडिया आघाडी संपुष्टात आली का असा प्रश्न काँग्रेस नेत्याच्या विधानानं निर्माण झाला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भाजपाला सत्तेतून बाहेर काढण्यासाठी सर्व विरोधकांनी एकत्र येत देशात इंडिया आघाडी बनवली. मात्र आरजेडी *(पान २ वर)*

## दिल्ली विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचा आपला पाठिंबा

नवी दिल्ली दि. ९ : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी २०२४ मध्ये महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर महाविकास आघाडीमधील घटक पक्ष काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्यात सर्वकाही अलबेल नसल्याचं दिसून येत आहे. कारण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने गुरूवारी ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसऐवजी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला आहे.

(शिवसेना उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार अनिल देसाई यांनी दिल्लीत *(उर्वरित पान २ वर)*






















